International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# "मुक्तीचा ध्यास घेणारी माधव सरकुंडे यांची कविता"

**अशोक हरी साळवे[1], प्रा. डॉ. युवराज मानकर[2]**
*[1]संशोधक, भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगाव*
*[2]मार्गदर्शक, भाऊसाहेब भोरे शिवशक्तीमहाविद्यालय, बाभुळगाव*
*Corresponding Author –* **अशोक हरी साळवे**
**DOI - 10.5281/zenodo.15245280**

***सारांश :***

*आदिवासी समाजाला वनवासी असे संबोधले जाते. 'वनवासी' म्हणजे वनात राहणारे पण सामाजिक दृष्टिकोणातून विचार केल्यास आदिवासींच्या जीवनात किती वनवास आहे, हे अनेक कविंच्या कवितेतून दिसून येते. आदिवासींना माणूस म्हणून जगणे अजून शक्य हात नाही. कारण ही समाज व्यवस्था आणखी त्यांच्याकडे दुय्यम नजरेने पाहताना दिसून येते. आदिम समाज आजही समस्येच्या गर्तेत जीवन जगत आहे, असे अनेक कवींच्या कवितेतून दिसून येते. ही सद्य: स्थिती आपणास मान्य करावीच लागेल.*

आदिवासी म्हणजे रानात राहणारे वनवासी, दारिद्री जीवन जगणारे, अर्धनग्न अवस्थेत असलेले, पशु-प्राण्यांच्या सहवासात राहणारे, राक्षस, पिश्याच्य, दैत्य, असूर काळेकुट व आपली भाषा आणि संस्कृती अतिशय आत्मियतेने जपणारा समुह म्हणजे आदिवासी. आदिवासी म्हणजे कोण ? हे सांगताना डॉ. विनायक तुमराम म्हणतात. "सद्यस्थितीत आदिवासी हा शब्द विशिष्ट पर्यावरणात राहणाऱ्या, विशिष्ट भाषा बोलणाऱ्या, विशिष्ट जीवन पद्धतींनी व परंपरांनी नटलेल्या आणि शेकडो वर्ष जंगल पहाडात जीवन जगत असताना आपली धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्ये जोपासणाऱ्या मानवसमुहाची ओळख करून देण्यासाठी वापरला जातो आणि फार मोठ्या प्रमाणावर त्यांच्या सामाजिक दुःखांवर, उध्वस्त प्रपंचावर हळहळ व्यक्त केली जाते. त्यांचे प्रश्न, समस्यांबद्दल कळवळून बोलले जाते. कधी अर्धनग्न राहून, कधी लंगोटी नेसून शिकार करण्यासाठी रानोमाळ भटकल्यामुळे त्यांना 'वन्यजमाती' म्हणून ओळखले जाते. कोणी त्यांना सहानुभूतीने 'धरतीची लेकरे' किंवा 'वनराईची लेकरे' म्हणून हाक मारतात. गिरिकुहरातील दीर्घ वास्तव्यामुळे त्यांना 'गिरिजन' हा शब्द काहिंना योग्य वाटतो. भारतमातेचे 'आदिसंतान' म्हणून आदिवासींना ओळखले जाते. अलिकडे 'आदिपुत्र' किंवा 'वनपुत्र' ही नावे देखील वापरली जातात. 'जंगलचे अनभिषिक्त राजे राजे म्हणूनही कोणी गौरपूर्ण उल्लेख करतात, असा विचार डॉ. विनायक तुमराम मांडतात. त्यांनी आदिवासी शब्दापासून ते त्यांच्या जीवनापर्यंतचा संपूर्ण व्यवहाराचा व्यापक पट वरील विवेचनात मांडला आहे.

आदिवासी म्हणजे कोण याची जाणीव झाल्यानंतर आदिवासी साहित्य म्हणजे काय ? ते साहित्य अन्य साहित्यापेक्षा वेगळे कसे आहे, याविषयी डॉ. विनायक तुमराम म्हणतात, "आदिवासी साहित्य म्हणजे किर्रर रानात, पहाडात आदिवासींना डांबणाऱ्या व्यवस्थेशी झगडणारे व तिला वठणीवर आणण्यास धजावलेले क्रांती साहित्य होय. इतर साहित्याप्रमाणे आदिवासी साहित्यालाही परिवर्तनाची अपेक्षा आहे. माणूस म्हणून जीवन जगता आले पाहिजे, म्हणजेच त्यांना हक्काची जाणीव झाली आहे, त्यांच्या अस्मितेची जाणीव झाली आहे. अस्तित्वासाठी विषमताधिष्टित

समाजालाच सुरुंग लावण्याचा प्रयत्न आदिवासी साहित्यिक साहित्यातून करताना दिसतात. आदिवासी आणि काव्य यांचा संबंध फार जवळचा आहे. आदिवासींनी केवळ काव्यरचना केली नाही तर त्यांनी प्रसंगानुरूप गायन आणि नर्तनही कले आहे. अनेक अनामिक आदिवासींच्या काव्यरचना काळाच्या पडद्याआड गेल्या व काही हाती लागल्या, त्यांना आपण 'लोकगीते' म्हणून संबोधतो. प्रसंग कोणताही असो त्याला अनुरूप आदिवासींची काव्य रचना आहेच. महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील आदिवासी जमातींनी आपले हे मुलधन जिवाच्या मोलाने जपून पिढी- दरपिढ़ी हस्तांतर करीत वर्तमानाच्या दारापर्यंत आणून पोहचविले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासींच्या जळत्या दुःखाला आपल्या काव्यात पहिल्यांदा स्थान दिले ते म. ज्योतीबा फुले यांनी.

**"गोंड भिल्ल क्षेत्री होते मुळधनी,**
**इराणी मागुनी आले तेथे**
**शुर भिल्ल कोळी शराने तोडीले**
**हाकलून दिले रानोवनी"**

आदिवासी हेच या देशाचे 'मुळधनी' व 'क्षेत्रपती' असल्याचे सांगून रानावनातील त्यांच्या दुर्दशेला जबाबदार कोण हे ही स्पष्ट केले आहे. स्वातंत्र्योत्तर आदिवासी जीवनाचे प्रतिबिंब आढळते ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीतेत'. 'दलितसेवा' या मथळ्याखाली राष्ट्रसंतांनी आदिवासींच्या ठणकत्या जखमांची आस्थेने दखल घेवून

**"काहींनी करावा आदिवासर सुधार**
**जावोनि रानी खेड्यावर"**

असे क्रांतीवंताना आव्हान केले.

आदिवासी मराठी साहित्याचा उदय कवितेच्या माध्यमातून विसाव्या शतकाच्या शेवटच्या पर्वात झाला असला तरी, गेल्या तीन दशकात आदिवासी कवितेच्या दोन- तीन पिढ्या उदयास आल्या आहेत. भुजंग मेश्राम, डॉ. विनायक तुमराम, वाहरु सोनवणे हे पहिल्या पीढीतील आदिवासी मराठी कवितेचे अस्सल कवी प्रतिनिधी आहेत. तर याच प्रवाहातील दुसऱ्या पीढीचे प्रतिनिधी म्हणून कविता आत्राम, माधव सरकुंडे, प्रभू राजगडकर, कुसुम आलाम इ. कवींना गौरविले पाहिजे.

तिसऱ्या पीढीतील सुनील कुमरे, दशरथ मडावी, पितांबर कोडापे, शंकर बळी, कृष्णकुमार चांदेकर, वामन शेडमाके, सौ.सुर्यकांत मिरासे, धांडे सारख्या अनेक कवींनी आदिवासी मराठी कविता सर्वार्थाने संस्कृतीच्या व्यापक परिप्रेक्षात अधोरेखीत केल्याचे दिसते. कथा-कादंबरी - नाटक, निबंध इ. वाङ्मय प्रकारांच्या तुलनेत आदिवासी मराठी कवितेने सर्वाधिक संख्येने व अर्थातच गुणवत्तेने मराठी वाङ्मयाचे विश्व भारावून टाकले आहे.

आदिवासी समुह जीवनाची व्यथा-वेदना, त्यांच्या सार्वत्रिक प्रश्नांची विविधता आणि गांभीर्य, आदिवासी कवीनी प्रकर्षाने शब्दबध्द केले. या कवींच्या कविता म्हणजे आदिवासी मराठी साहित्याची पहाट आहे. हा काव्यमय सूर्योदय आदिवासी जीवनाच्या अंधारमुक्तीचा प्रारंभ ठरला. तेव्हा आदिवासींच्या सांस्कृतिक संचिताच्या अजेंड्यावर माधव सरकुंडे यांचे बहुरंगी व बहुआयामी वाङ्मयीन कर्तृत्व, कविता, कथा व कादंबरीच्या विश्वात विशेष लक्षवेधक ठरले आहे.

'बंधुनों' ही हाक व्यापक अर्थाची असली तरी या शब्दाचा भावार्थ सरळ सरळ आदिवासी 'सगा-साथी' साठीच असल्याचे स्पष्ट होते. पेटलेल्या डोंगराची ओंजळभर आग घेऊन आदिवासींचे प्रपंच जाळणाऱ्या व्यवस्थेची होळी करण्याचे आवाहन, हा कवी करतो. काळोखाच्या अरण्यात अडकुन पडलेल्या असंख्य गावाना पहाट देण्याचा संकल्पही या कवीने केलाय. संस्कृतीच्या शवागारात आदिवासींचे आयुष्य सडत ठेवणाऱ्या व जीवंतपणीच मरणाची सक्ती ठोठावणाऱ्या प्रस्थापित जल्लादांचा शोध घेण्याचाही या कवीचा निर्धार आहे.

अर्थात ही क्रांती एकटा करत नाहीतर त्याच्या बंधुत्वाने जोडलेल्या नी जुळलेल्या जनांच्या साथीने कवी नव्या पर्वाचा प्रारंभ करु इच्छीतोय. नव्या युगाचे नवे वारे पायाशी उभे असताना, चेहऱ्यावरील सनातन नैराश्य नि मनामनावरील स्मशान साम्राज्य आता संपवण्याचे कवीचे आवाहन आहे.

हजारो वर्षांचा मरण भोगण्याचा व जगण्याचा काळ, नव्या भारतीय संविधानामुळे खाक झाला. संविधानात्मक मूल्यांनी उपेक्षित आदिवासीसह सर्वांचेच श्वास जीवंत केलेत. या संधीचा योग्य लाभ घेऊन कवी त्याच्या बंधुना वादळाशी दोस्ती करण्याचा नि विजांशी लळा लावण्याचा सल्ला देतोय. भूकंप मुठीत घेण्याची आणि वणव्यात घर बांधण्याची कवी कल्पना क्रांतीचा कैवार घेणारीच आहे. तलवारीपेक्षाही अधिक धारदार शब्दांची गरज कवीने स्पष्टपणे प्रतिपादन केली आहे. कारण कवी माधव सरकुंडे यांना सार्वत्रिक परिवर्तनासाठी सांस्कृतिक क्रांतीची आवश्यकता वाटते आणि सांस्कृतिक क्रांतीचे माध्यम धारधार शब्दचं असू शकतात.

कवीच्या मते, प्रश्नांच्या मालिकेतूनच आदिवासींची दुःखद व शोकात्म भूतकाळाचे गुपीत उघड होईल. शिवाय आदिवासींचा पूर्वइतिहास, शौर्य-पराक्रमासह अनेक मानवीय श्रेष्ठ मूल्यांच्या पावित्र्यातूनच आकारास आल्याचे सत्य सुध्दा कवी सांगतो. आदिवासींचा भूतकाळ सूर्य, चंद्र, तारांगण व रणांगणानेही भारलेला असल्याची अभ्यासपूर्व साक्ष हे शब्द देतात.

संविधानाच्या साक्षीने सिध्द होणाऱ्या अर्थसंकल्पात आदिवासी- वंचितांची विवंचना उमटत नसल्याची व घडणाऱ्या अन्याय अत्याचाराचे ऑडीट, भारतीय लोकशाहीच्या विद्यामान वाटचालीत होत नसल्याची गंभीर तक्रार या कवितेने केली. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य संशयास्पद ठरुन लोकशाहीची बदनामी संविधानाच्या साक्षीने चालु असल्याचे सत्य या कवितेचे शब्द सांगू पाहतात.

क्रांतीचे गीत गाणाऱ्या व स्वच्छंदपणे वाहणाऱ्या नद्या, मनुचे गटार, उजेडाच्या लाटा, डोळ्यातले सूर्य, अशा अनेक प्रतिमा प्रतिकांची उधळण या कवितेचेच नव्हे तर एकूणच काव्य संग्रहाचे खास वैशिष्ट्य आहे.

प्रस्थापित अन्यायी व्यवस्थेच्या संबंधाचे आपल्याच बांधवाना कवी सरकुंडे यांनी सामाजिक – आर्थिक - धार्मिक स्वरुप व वास्तवाचा शोध घेण्यास बाध्य करणारे मुलभूत प्रश्न विचारलेत. आदिवासींच्या पूर्वपिढ्यातील माय-बापानी ज्या शिवारात कष्ट करुन रक्त ओकले, त्या शिवाराला 'हिशोब' मागीतला का ? ज्या गावगाड्याने शिक्षणाची पाटी हिसकावून शेणाची पाटी डोक्यावर कायम ठेवली. त्याला समन्स पाठवले का ? ही या प्रश्नांची आशय सूत्रे इतिहाला हादरा देतात. कविला आदिवासी जनतेचे उज्वल भविष्य प्रयत्नपूर्वक घडवायचे आहे. त्यासाठीच या कवितेचा जन्म सोहळा संपन्न होतोय. सूर्यासगट चोरी गेलेले क्षितिज आणि हंबरुन मेलेल्या कित्येक 'चंद्राचा 'हिशोब' या कविला पूर्ण करावयाचा आहे. त्यासाठीच या कवितेचा जन्म झाला.

आदिवासींचे अस्तित्व नाकारणारे प्रस्थापित धर्म आणि संपूर्ण आदिवासी जीवनच उन्हात उभे करणारे धर्मग्रंथ, त्याच परंपरेतील महाकाव्यासह कवीने निर्धारपूर्वक नाकारले. कविचा हा ऐतिहासिक विद्रोह, चिंतनाच्या वस्तूनिष्ठेवर आणि वैचारिक विशुध्दतेच्या ध्यासावर उभा आहे. रक्त पिऊन जगणाऱ्या पुरोहितशाहीचा धिक्कार करण्याचे क्रांतीवादी कर्तव्य या काव्यात्म शब्दांनी इमानदारीने पार पाडलेय. या संदर्भात कवीने बिनतोड प्रश्न उपस्थित केलेत. कवी म्हणतो.

**"तुम्ही उन्हात नांगर हाकता**
**तरी चटणीला दुसण्या मारता**
**भटजी सावलीत बसून देवाचा खिसा कापतो**
**तरी तो तुपाशिवाय खात नाही**
**मला हे सांगा आता**
**तुमच्या देवाला**

**इतके साधे कसे कळत नाही ?”**

इश्वराचे अज्ञान सिध्द करणारे, धर्मशास्त्रीय व समाजशास्त्रीय अभ्यासातून आकारास आलेले काव्य चिंतन, देवा-धर्माच्या तथाकथित अस्तित्वाला व अर्थपूर्णतेला धक्का देण्या इतपत इथे क्रांतीची बिजे पेरुन जाते. आशय सुत्राची ही जागा सर्वच निरिश्वरवादी पण मानवीय कल्याणाच्या ध्यासाने पवित्र ठरलेल्या दार्शनिक प्रवाहांशी संवादी ठरते. माधव सरकुंडे यांनी स्पष्टपणे मार्क्स, आंबेडकर, गांधी, बुध्द, फुले या किंवा अन्य कोणत्याही तत्वज्ञानाची बांधिलकी प्रत्यक्ष स्वीकारल्याचे दिसत नाही. त्यामुळे त्यांची कविता कोणत्याही एका वादाच्या चोकटीत बंदिस्त होत नाही. या कवितेची बांधिलकी आदिवासींच्या जीवन-मरणाशी व उपेक्षितांच्या अस्मितेशीच आहे. तिचे इमान आणि समर्पण आदिवासींच्या श्वासात मिसळले आहे. म्हणूनच सर्व प्रवाहातील सर्व महात्मा, सुधारक व क्रांतीकारकाचे मूल्यात्मक सामर्थ्य कवी सरकुंडे यांच्या कवितेचे व्यापक अधिष्ठाण बनले.

प्रांरभीच्या ‘बंधुनो’ या प्रदीर्घ काव्यात कवी माधव सरकुंडे यांच्या वैचारिक भूमिकेचे सामर्थ्य आणि काव्यात्मकतेचे बळ अभिव्यक्त झालेय.

कवितेकडे पाहण्याचा या कवीचा दृष्टिकोन मुलतः इतरांपेक्षा भिन्न आहे. तत्वज्ञानात्मक ग्रंथ, परिवर्तनवादी महापुरुष इ. दार्शनिक व्यक्ती संस्थाकडून जी प्रेरणा मिळते ते सर्व काही या कविला कवितेतुन प्राप्त होते अशी त्यांची धारणा आहे. मृगजळांनी वेढलेल्या आयुष्याला कविता मुक्त करते. आपण कविता लिहित नसून पेटलेल्या शब्दांचे चुंबन घेतो, 'कागदावर हृदय शिंपडतो' अशी एकरुपता कवि व कविता यांच्या ठाई अनुभवताना कवी सरकुंडे यांचे समर्पण मोलाचे ठरते.

आपण हौशी खातर लिहीत नसून ‘कैफियत’ मांडण्यासाठी काव्याचे प्रयोजन असल्याचे कवीचे म्हणणे आहे.

अर्थात भूकेल्या जीवासाठी स्वतःचे ‘काळीज कांडणारी’ ही कविता स्वाभाविकपणे सर्वहारा वर्गाच्या कैवारातून उभी राहताना दिसते. म्हणून या कवितेला मार्क्सवादी, आंबेडकरवादी किंवा गांधीवादी अशा कोणत्याही ‘लेबल’ ने बंदिस्त करणे योग्य होणार नाही. कारण भाकरीच्या प्रश्नाची व एकूणच मानवाच्या वेदनामुक्तीची मक्तेदारी कोणत्याही एका दर्शनाची असल्याचे मानता येत नाही.

कवितेचे सामर्थ्य, तिचे प्रयोजन, तिचा परिणाम आणि काव्यात्म मूल्य, या संबंधाने माधव सरकुंडे यांची भूमिका स्पष्ट असून सत्याची बांधिलकी स्वीकारणारीच आहे. म्हणजेच भौतिक जीवनातील व्यथा - वेदनांचा धांडोळा, विविध अनुभूतिच्या माध्यमातून इथे अभिव्यक्त झालाय.

विद्रोहाची पोज घेऊन नाटकी आक्रमकता शब्दात पेरण्याची शैली, या कविला मान्य नाही. पण संयत व समतोल शब्दाच्या महिरपीमध्ये सहज अवतरणारी बंडखोरी या कवितेचे खास वैशिष्ट्य मानता येते. या संदर्भातील “मैलाचा दगड होऊन” ही कविता चक्क परमेश्वराच्या संकल्पनेचे अशास्त्रिय स्वरुप विशद करुन इश्वरी जग खऱ्या खुऱ्या उपभोगाच्या टप्यातील नसल्याचे सत्य सांगू पाहते. आणि अर्थातच कविचे हे सांगणे कुठलाही आव न आणता अगदी सहज स्वाभाविकपणेच सांगीतले जाते.

मंदिरातील शेंदराचा दगड होऊन व परमेश्वरी खोळ पांघरुन कुणाची दिशाभूल करण्यापेक्षा, लोकांना दिशा दाखवणारा मैलाचा दगड होण्यातच या कविला धन्यता वाटते. निरिश्वरवादाचा अर्क नि अर्थ पचविलेली सरकुंडे यांची काव्यप्रतिभा, या कवितेत हजार नास्तिक ग्रंथाचे बळ आणि मूल्यही प्रगट करते. इश्वरी संकल्पना, मानवी जगताची दिशाभूल करणारी व घोर फसवणूक करणारी असल्याचा स्पष्ट निर्वाळा कवीने इथे दिला आहे. इथे या कवितेचे दार्शनिक सामर्थ्य, जगातील संपूर्ण अस्तिकवादी तत्वज्ञानाच्या आणि इश्वरकेंद्री सर्व धर्माच्या विरोधात उभे राहते. आशयाचे हे नास्तिकवादी सूत्र चार्वाक, बुध्द मार्क्स आंबेडकरांच्या तत्व-विचारधारेशी व - त्यांच्या कर्तृत्वाशी विनम्रपणे संवाद साधुन अवतरते.

कवीच्या मते अस्तित्वात नसलेल्या स्वर्गाचे प्रलोभन दाखवण्यात पराक्रम कोणता ? जनतेसाठी स्वतःचे धगधगते आयुष्य समर्पित करण्याचा या कविचा इरादा आहे. त्यासाठी कवीने अट घातलीय. “अंधार हटवायचा असेल तर उजेडाचे पहारेकरी झाले पाहिजे. चेहरा असलेला समाज निर्माण करायचा तर गर्दीच्या बाहेर आले पाहिजे.” कवीला आपल्या समाजातील माणसांच्या जंगल वस्त्यांच्या उज्वल भविष्याचा विश्वास आहे. कारण कवीने पेरलेले लहानशे क्षितिज उद्या ‘सूर्य’ होऊन उगवणार आहे आणि उपेक्षेचे उरुस होणार आहेत. पृथ्वी आणि आकाशावर, प्रस्थापित धर्म - समाजाने स्वतःच कब्जा करुन सर्वार्थाने लुट केली. आदिम आदिवसीना म्हणजे मुळ एतद्देशिय भूमिपूत्रांना सर्वच देशातील प्रस्थापित समाजाने रानावनात हाकलून दिले. कवी म्हणतो “ही पृथ्वी हे आकाश आपले नाहीत म्हणून काय झाले ? आपले पंख तर आपले आहेत.” मुर्दाड मनाची सनातन निराशा झटकून सूर्यमंडळातील दडलेल्या अनंत आकाश शोधण्यासाठी उंच भरारी घेण्याचा आशावाद ही कविता रसिक वाचक मनात पेरुन जाते.

पृथ्वी आकाशाच्या संपूर्ण अवकाशात जगण्यासारखे काहीही शिल्लक नसताना, नव्या आकाशाच्या शोधासाठी संपूर्ण सूर्यमंडळ धुंडाळण्याचे स्वप्न पेरणारी ही कविता, दुर्दम्य-ज्वलंत आशावादी काव्य- नमुना म्हणुन एकूणच मराठी कवितेच्या प्रवाहात दुर्मिळ दिसते.

माधव सरकुंडे यांना अलंकृत रचनेचे, नादमधूर काव्य शैलीचे वेड नसल्याने त्यांची कविता कृत्रीम भूषणापासून मुक्त आहे. या कवितेचा आशयच जळजळत्या वास्तवाचा निखारा होऊन शब्दात साठतो. त्यामुळे दोऱ्याच्या रिळाप्रमाणे सहज उलगडत जाणारा या कवितेचा पोत आहे. अलंकारमुक्त कविता गद्याकडे झुकण्याचा धोका असतो. पण या कवितेने हा धोका ठुकरावून उत्कट चिंतनाची व प्रगल्भ जाणिवांची काव्यात्म कलाकृती दिली आहे. म्हणूनच तिचे काव्यात्म मूल्य श्रेष्ठ कलाकृतीच्या निकषावर तावून सुलाखून उतरते आणि अस्सल अनुभूतीची उधळणही करते.

आत्मनिष्ठ जीवनानुभूतीपेक्षा समुहनिष्ठ अनुभवाच्या अभिव्यक्ती-करणात, कवी सरकुंडे यांची कविता अधिक रममाण होताना दिसते. शिवाय कवी सरकुंडे हे अभ्यासू प्राध्यापक असल्याने त्यांचा व्यासंग समाजशास्त्र, धर्मशास्त्र, इतिहास, अर्थकारणासह तत्वज्ञानाच्या क्षेत्रातही रुळलेला दिसतो. म्हणुनच त्यांच्या समाजनिष्ठ अनुभूतीच्या कवितेतील चिंतनात शुध्द व सत्यनिष्ठ वैचारिकतेच्या दृष्टिने दोष आढळत नाहीत.

या संदर्भात प्रगल्भ चिंतन आणि सौंदर्यपूर्ण काव्यशैलीचे काही उदाहरणे पुढील प्रमाणे लक्षात घेणे योग्य होईल.

1) **युध्दापेक्षाही भयानक असतात**
**पराभूत माणसं !**
**विजय असतो तात्पुरता युध्दविराम**
**आणि पराभव प्रारंभ प्रदीर्घ युध्दाचा !**
(युध्दानंतरचे बगदाद)

2) **उगवण्याच्या इराद्यापेक्षा**
**काहीच नसते कठोर !**
**अन् ज्यांच्याकडे नसतात इरादे**
**ते कधीच उगवत नसतात !** (निवड)

3) **कितीही उंच भिंत उभारली पूर्वेला**
**तरी सूर्योदय थांबवता येईल तुम्हाला ?**
(इतिहास)

4) **शिकार करणारे असूनही**
**आपण शिकार कसे झालो ?**
(शिकार कसे झाले ?)

5) **मी धुऊन घेतले**
**माझे रक्त बुध्दाच्या नदीत**
**म्हणूनच तर झालेत माझे श्वास अजिंक्य**
(तुम्ही ठरवा )

6) **पेट्रोल महाग होवो की जळो !**
**मला चिंता वाटत नाही त्यांची**
**माणसांच रक्त स्वस्त झालय**
**हीच काळजी खाते मला**
(युध्दा नंतरचे बगदाद)

कवी माधव सरकुंडेची कविता सर्वप्रकारच्या विषमतावादाचा धिक्कार करुन, उपेक्षित मानवी समुहाच्या क्रांतीप्रवण जाणिवांचा कैवार घेते. 'क्रांतीचा ढोल' या कवितेच्या शब्दात जोरकस आवाजात वाजत नसला तरी, तिची दिशा मात्र परिवर्तनाच्या माध्यमातून क्रांतीची अवस्था प्राप्त करण्याचीच आहे.

सत्तीने विस्थापित केलेल्या आदिवासींच्या इतिहासातील गौरवशाली घटना - प्रसंग आणि क्रांतीवीरांना, प्रस्थापितांच्या इतिहासात जाणिवपूर्वक स्थान नाही. म्हणून कवी सरकुंडे 'इतिहास' या कवितेत गंभीर तक्रार नोंदवतात. सत्याचा आपलाप करणाऱ्या इतिहासाचार्यांच्या पालख्या वाहण्यात धन्यता मानणारी विद्यापीठे, पक्षपाती असल्याचा घणाघाती घाव ही कविता घालते. 'आता आमचा इतिहास आम्हीच लिहू' असा या कविचा निर्धार आहे. डोंगराच्या पाटीवर नव्याने इतिहास लिहून बिरसा मुंडाचे उलगुलान संपूर्ण जगाला सांगण्याचा कवीचा संकल्प आहे. सिध्दु, कान्हा, ताना, तंट्या, खाज्या या सारखे असंख्य बंडखोर शुरवीर देशाच्या विभिन्न प्रदेशात वेगवेगळ्या कालखंडात 'ज्वालामुखी' होऊन अवतरले. त्यांच्या ज्वालांनी आमचे भविष्य आम्हीच निर्माण करु ! पण आमच्या इतिहासात शिष्याचा 'अंगठा छाटणारा गुरु' नसेल आणि शंबुकाचे शिर्काण करणारा राजाही नसेल, असा विश्वास ही कविता शब्दांच्या माध्यमातून पेरत जाते. कुणाचीही प्रतारणा करणारा पक्षपाती इतिहास हा सत्याचा खुन करणारी विकृती असते हाच सुविचार ही कविता देऊन जाते. वर्णव्यवस्थेचे पुराणकालीन समर्थन - सूत्र, संशोधनाच्या व सत्याच्या बळावर धिक्कारुनच ही कविता, माणसांच्या नव्या विधायक कर्तृत्वावर आधारीत, इतिहासाची मांडणी स्वीकारते.

आदिवासी परंपरेतील सर्वच प्रादेशिक इतिहासात उपेक्षित राहिलेली बंडखोर क्रांतीवीराची चरित्रे, या कविला अभिमानाचा विषय वाटतात. तरीही अतिरिक्त श्रध्दांचा पान्हा आवरुनच वस्तुनिष्ठ गौरवाच्या नोंदी काव्यत्म केल्याचे दिसते.

निळ्या ढगांची गर्दी हा भारतीय लोकशाहीला दिलेल्या संविधानात्मक आंबेडकरवादी मूल्यांचा ठेवा आहे. निळा रंग स्वप्नांचे प्रतिकही आहे आणि डॉ. आंबेडकरांच्या राज्य समाजवादाचे नि त्यांच्या एकूणच समतानिष्ठ स्वातंत्र्य - बंधुत्ववादी भूमिकेचा प्रतिकात्मक रंगही आहे. भारतीय स्वातंत्र्याची पहाट आणि आंबेडकरी विचार या कवितेत असा अधुन मधुन प्रतिबिंबीत होत रहातो. याच संदर्भात कवीतेची पुढील साक्ष महत्त्वाची ठरते.

**"मी उगवलोय खडकाळ सूर्यासोबत**
**आता माझ्या क्षितिजावरुन**
**कायम हटलीय संध्याकाळ**
**अन् उरली फक्त निळी पहाट"**

निळाईचे हे अर्थपूर्ण संदर्भ दलित आदिवासी साहित्य संस्कृतीत समाजाच्या नव्या संवाद पर्वाची संसूचन करतात.

आदिवासींच्या जन्मकळा अनुभवलेला हा कवी स्वसमाज जीवनाच्या अनुभव विश्वापलिकडे छलांग मारुन व जात-जमात वादाची उतरंड ओलांडून 'पारध्याच्या पोराचा प्रश्न' काव्याच्या केंद्रस्थानी आणतो. तेंव्हा आदिवासी कवितेला नवे भान व नवे परिमाणही प्राप्त झाल्याची साक्ष मिळते.

दलित भटके - विमुक्त, आदिवासी, श्रमिक, कामगार, शोषित, स्त्रिया, भिकारी, शेतकरी, मजुर अशा विभिन्न संदर्भांनी समाज विभागला असुन या सर्व समुहाची वेदना हाच सर्वहारा वर्गाची मुख्य प्रश्न आहे. पण दलित, कामगार, शेतकरी, भटके इ. गटांतील लेखक कवीचे साहित्य निर्मिती, ही त्यांच्या जन्मसंदर्भाशी निगडीत जात. गट जाणिवेशी संबंधीत राहील्याचा वर्तमान इतिहास आहे. मानव निर्मित भेदाच्या भिंती फोडूनच झालेली कला निर्मिती ही अधिक श्रेष्ठ आणि व्यापक जनहिताचा ध्यास व्यक्त करणारी ठरते.

पेट्रोलच्या महागाईपेक्षा कवीला 'माणसांच रक्त स्वस्त झाल्याची' जाणिव जाळते आहे. बेचिराख झालेल्या कबुतरांचे भयभीत भाव बगदादच्या

बालकाच्या डोळ्यात कविला दिसतात. ही आग कुणीतरी थांबवलीच पाहिजे अशी कवीची तळमळ आहे. अन्यथा जगाचे ‘खांडववन’ होण्याची कविला भिती आहे. ‘बुशची पोरं’ विजयाच्या जल्लोषात उन्मादात उड्या मारत असली तरी, कोणत्याही युध्दातील विजय हा तात्पुरता असतो. कारण ‘पराभव हा पुढच्या प्रदीर्घ युध्दाचा प्रारंभ असतो’ कवीची ही मांडणी मराठी कवितेतील कोणत्याही सर्वश्रेष्ठ ठरविलेल्या तत्वज्ञानात्मक काव्यानुभूतीशी स्पर्धा करणारी कालकृती ठरते ! कवीचे हे सुविचारांचे सामर्थ्य गौरवास्पद आहे.

पुराण, इतिहासासह जगातील सर्व धर्मांचा नि वर्तमान आंतरराष्ट्रीय वास्तवाचा सूक्ष्म अभ्यास, मानवाच्या वेदनामुक्तीच्या ध्येयवादाची पूर्व अट म्हणून कवी माधव सरकुंडे यांच्या कवितेतुन प्रगट झाल्याचे दिसते. विद्रोह पुजताना हा कवी माणसाचे सर्वकालीन ‘माणुसपण’ जपतो. विकृतीचा नाश करताना संस्कृतीचे संचित कुरवाळतो. शत्रुशी भांडतांना स्वसमाजाच्या आत्मपरिक्षणाची निकड सांगतो. माणसा-माणसातील कायमच्या युध्दाचा विरोध करतो. पण अन्याय-अत्याचार मुक्त व शोषणमुक्त नव्या समाजचे स्वप्नही रंगवतो. कवीचा सांस्कृतिक ध्येयवाद मानवीय मूल्यांच्या अधिष्ठाणावर उभा आहे. म्हणून तर त्यांची कविता सत्याच्या व कल्याणाच्या मानवीय अटिमध्ये अभिव्यक्त होते.

व्यापक मानवतावादाची अपेक्षा कार्यान्वीत करतांना कविला स्वसंबंधाची दैन्यावस्थाही अस्वस्थ करते. तेंव्हा विशाल व्यापक सांस्कृतिक मूल्यात्मकतेला बाजूला ठेवून पुन्हा या कविला आदिवासी जनतेच्या व्यथा-वेदनापूर्ण जीवनला मुक्त करणारा विचार काव्यातुन मांडावा लागतो. अर्थातच प्रत्येक दलित आदिवासी कवी लेखकाच्या मनातील हे आंर्तद्वंद्व समजून घेणे आवश्यक असते.

कवी सरकुंडे आदिवासी बांधवांना जागृत करण्याचा प्रयत्न करतात. स्वाभिमान ठेचणाऱ्या दगड-धोंड्यापुढे वारंवार मान झुकल्यामुळेच 'लाचारी' हीच या समाजाची ओळख बनली. वेदांतिक उधळीने डोळे खाऊन टाकले म्हणून तर चकव्यांच्या रानावनात अनादिकाळापासून आदिवासी भटकतो आहे. वैदिकांच्या प्राचीन संस्कृतीचा कवीने केलेला पंचनामा, आधुनिक सनातन भक्तांना अंर्तमुख होण्यास भाग पाडतो. ‘'आंबेडकर चौकात’ फुलांचे हार नाकारुन कवीने काळजात काट्यांना जागा करुन दिली. तेंव्हा पासून कवितेच्या शब्दात आत्मभान आले. ही बाब फार महत्वाची आहे.

युगानूयुगे आदिवासींना बंदिवान करणाऱ्या ‘तुरुंगाचे दार’ कवीने तोडले आहे. त्याच तुरुंगात खितपत पडलेल्या आदिवासींनी बिरसा मुंडाच्या हाका ऐकून तुरुंगाबाहेर यावे. आणि कवी सोबतच ‘उलगालन’ चा मार्ग स्वीकारावा अशी कवीची तळमळ आहे.

माधव सरकुंडे यांना एकूणच वाङ्मयीन जाण आहे. त्यांचा व्यासंगही चौफेर आहे. त्यांची कविता आदिमांच्या गहीवरातून फुलते. या कवितेला अश्लिल असभ्य शब्दांचा विटाळ आहे. अन्यायग्रस्तांचे व्याकुळ गाऱ्हाणे मांडतांना, ती शत्रू ओळखतेच. पण स्वसमाजाच्या आत्मभान जागृतीला ही कविता निर्णायक महत्व देते. सूस्पष्ट वैचारिकता, शुध्द प्रयोजन, वस्तुनिष्ठ चिंतनाची काव्यात्म अभिव्यक्ती परिवर्तन, क्रांती या संकल्पनांचा उच्चार करत, संयमीपणे पेरलेले क्रांतीसन्मुख भान अंतिम पर्वातील मानवीय मूल्यांचे स्वाभाविक गहीवर, अशा अनेक गुणवैशिष्ट्यांनी कवी सरकुंडे यांची कविता, आदिवासी वाङ्मयीन प्रवाहाचे भूषण ठरली आहे. आशयदृष्ट्या या कवितेचे नाते नारायण सुर्वे, वि.दा.करंदिकर यांच्यासह भुजंग मेश्राम व वाहरु सोनवणेच्या काव्याशी जुळून आहे. म्हणुनच मराठी कवितेच्या समग्र परिवर्तनवादी प्रवाहात या कवितेला विशेष गौरव प्राप्त होण्यास अडचण नसावी ! माधव सरकुंडे यांच्या काव्यप्रवासास त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वास आणि आदिवासी समाजाच्या विकास कार्यास माझ्या हार्दिक शुभेच्छा देणे माझे सर्वार्थाने सांस्कृतिक कर्तव्य आहे.

**निष्कर्ष :**

1) साठोत्तर वाङ्मय प्रवाहातील एक महत्त्वाचा वाङ्मय प्रवाह म्हणून आदिवासी साहित्याकडे पाहिले जाते.
2) या समाजव्यवस्थेत आदिवासी सारख्या सामान्य माणसाला जीवन जगणे कठीण झाल्याचे काव्यातून निदर्शनास येते.
3) राजकीय संस्कृतीच्या केवळ आश्वासनामुळे आदिवासी समाजापर्यंत कोणत्याही आधुनिक सेवा-सुविधा पोहचत नाहीत याचे चित्रण काव्यातून दिसून येते.
4) आदिमांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क आजतागायत मिळत नाही.
5) केवळ वर्णव्यवस्थेमुळे सवर्णांनी आदिमांना आपल्या टाचेखाली दाबून ठेवल्याचे भिशण वास्तव काव्याच्या माध्यमातून निदर्शनास येते.

**संदर्भ ग्रंथ :**


1) 'मी तोडले तुरूंगाचे दार' या कवितेच्या संदर्भात डॉ. श्रीपाल सबनिस, पुणे, 2011.
2) 'साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह' डॉ. शरणकुमार लिंबाळे, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., 251, क, शनिवार पेठ, पुणे - 411 030, द्वि.आ. 6 डिसेंबर 2014.
3) 'आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या', संपा. डॉ. प्रमोद मुनघाटे, प्रतिमा प्रकाशन, 1362, सदाशिव पेठ, पुणे-411030, प्र.आ. 30 जानेवारी 2007.
4) 'साहित्य विविधा आणि समिक्षा', प्रा. डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे, प्रतिमा पब्लिकेशन, पुणे, 8, अभिनव अपार्टमेंट, गुरूविहार कॉलनी, भोसरी, पुणे - 411039, प्र.आ. 4 मार्च 2018.
5) 'आदिवासी मराठी साहित्य एक अभ्यास', डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, स्वरूप प्रकाशन, 'अक्षर', 858, सह्याद्री नगर, एन-5 (सिडको), औरंगाबाद – 431003, द्वि. आ. 17 नोव्हेंबर 2012.